ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

सामना

# फिनोलेक्सतर्फे गरजूंना मदतीचा हात

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी) - कोरोना, निसर्ग चक्रीवादळामुळे देशाच्या विविध भागांत नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या संकटकाळात फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनने संपूर्ण देशात मदतीचा हात दिला आहे.

मुकुल माधव फाउंडेशनचा २६वा वर्धापन दिन नुकताच झाला. या निमित्ताने व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी माहिती दिली.

रितू छाब्रिया म्हणाल्या, अनामित्र आणि विकास खन्नाज फीड इंडियाच्या सहकार्याने एक लाखापेक्षा जास्त लोकांना अन्नधान्य दिले आहे. पुण्यातून बाहेरगावी जाणाऱ्या १३ हजार मजुरांना पादत्राणे आणि जेवण देण्यात आले. एचआयव्हीग्रस्तांना मास्क तयार करण्याचा रोजगार देण्यात आला.




देशातील अनेक रुग्णालयांत वैद्यकीय उपकरणे, सॅनिटायझर, मास्क, पीपीई किट देण्यात आले. वेंकीजच्या साहाय्याने एक लाख अंड्यांचे वाटप करण्यात आले. निसर्ग, अम्फान चक्रीवादळाने नुकसान झालेल्या आसाममधील २० हजार पूरग्रस्तांना मदत करण्यात आली. लडाखमध्ये झालेल्या चकमकीत शहीद २० जवानांच्या कुटुंबाना अर्थसाहाय्य दिल्याचेही छाब्रिया यांनी सांगितले.